Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl. No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.नं.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्युटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email :- [illegible]
Tel :- Chairman (p) :- STD (020)-25651751 EPABX :-(020)-25705000 Secretary(P) :- (020)-25651750

क्र.रा.म./परीक्षा-८/ १०३८
पुणे -४११००४
दिनांक -२४/०२/२०२१

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी ) एप्रिल-मे २०२१ नियमित, पुनर्परिक्षार्थी, तुरळक विषय, श्रेणासुधार योजनेअंतर्गत तसेच ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) विद्यार्थ्यांची अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत ...

संदर्भ:- जा.क्रं.रा.मं./परीक्षा-३/२४५ दिनांक २५/०१/२०२१ चे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र.४६ अन्वये एप्रिल-मे २०२१ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस नियमित, पुनर्परिक्षार्थी, तुरळक विषय, श्रेणासुधार योजनेअंतर्गत तसेच ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह ऑनलाईन परीक्षेची आवेदनपत्र स्विकारण्याची मुदत दिनांक १३/०२/२०२१ रोजी संपली आहे. त्यानंतर दिनांक १४/०२/२०२१ ते दिनांक २८/०२/२०२१ पर्यंत आवेदनपत्र स्विकारण्याची प्रक्रिया स्थगित करण्यात आलेली आहे. सदर मुदत संपल्यानंतरही (१) श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी ३० दिवसाच्या कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिदिनी रु.५०/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क, (२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे, त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रती दिन रु.१००/- विशेष अतिविलंब शुल्क व तदनंतरच्या १५ दिवसांकरीता व परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत रु.२०० प्रमाणे (शासनाचे क्र.एसएससी-२०११(१८५/११)/उमाशि-२ दिनांक ०२ फेब्रुवारी २०१२ च्या पत्रानुसार) अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

विलंब शुल्कानंतरची अति विलंब/विशेष अतिविलंब/अति विशेष अतिविलंब शुल्काची आवेदनपत्रे ही माध्यमिक शाळांनी ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्यानंतर विद्यार्थी व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची मूळ प्रत (Print Out) शुल्कासह विभागीय मंडळाकडे सादर करण्याबाबत सर्व माध्यमिक शाळांना कळवावे. ज्या शाळांची आवेदनपत्रे मंडळाकडे जमा करण्यास येतील अशा शाळांकडून नियमानुसार आवेदनपत्र जमा करण्याच्या दिवसांपर्यंतचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अति विशेष अतिविलंब शुल्क घेण्यात यावे.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.५०/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिममुदत (रु.१००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अति विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.२००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा | सोमवार दिनांक ०१/०३/२०२१ ते सोमवार दिनांक १५/०३/२०२१ | मंगळवार दिनांक- १६/०३/२०२१ ते मंगळवार दिनांक-३०/०३/२०२१ | बुधवार दिनांक-३१ /०३/२०२१ ते रविवार दिनांक- ११/०४/२०२१ |

* विभागीय मंडळाच्या परीक्षा शाखेने प्राप्त शुल्क व ऑनलाईन आलेली आवेदनपत्रे यांची तपासणी करणे आवश्यक आहे.
* नव्याने नोंदणी झालेल्या खाजगी विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्र भरण्याच्या तारखांबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे विशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबंधित माध्यमिक शाळा प्रमुखांना सोबतच्या नमुन्याप्रमाणे (परिशिष्ट- अ) विहीत प्रपत्रासह पाठविण्यात यावे. तसेच संदर्भीय पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्र स्विकारतांना मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्यांचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होऊ शकला नाही तर विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब शाळांमार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी.

सोबत जोडलेल्या विहीत तक्त्यामध्ये विद्यार्थ्यांबाबतची संपूर्ण अचूक माहिती (कालावधी व दंडाची रक्कम) तपासून सदर तक्ता (परिशिष्ट- ब) मा. विभागीय अध्यक्ष यांच्या शिफारशी व स्वाक्षरीसह मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचे मंजूरीकरिता पाठविण्यात यावा. मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांच्या मंजुरीशिवाय सदर विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचेकडे विद्यार्थ्यांकडून परस्पर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याबाबतही सर्व शाळा प्रमुखांना कळविण्यात यावे.

शाळांकडून प्राप्त झालेला माहितीचा तक्ता (परिशिष्ट-अ) राज्यमंडळाकडे पाठविण्यात येऊ नये. तसेच इतर कागदपत्रेही राज्यमंडळाकडे पाठवू नयेत. (उदा. विद्यार्थ्यांचा अर्ज, वैद्यकिय दाखला इ.) याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठविण्यात यावा.

राज्यमंडळ कार्यालयाकडून अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र स्विकारण्याची मंजुरी परीक्षा सुरु होण्यापूर्वी घेण्यात यावी. तसेच राज्यमंडळ कार्यालयाकडून परीक्षा सुरु होण्यापूर्वी मंजुरी देणे शक्य होईल, अशा बेताने अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काचे आवेदन पत्राचे तक्ते राज्यमंडळाकडे सादर करण्यात यावेत तसेच दिनांक ११/०४/२०२१ नंतर ऐनवेळेस प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांसाठी प्राप्त दिनांकापर्यंत अतिविशेष अतिविलंब शुल्क रु.२००/- प्रतिदिन आकारण्यात यावे व त्यांची मंजूरी सबळ कागदपत्रासह प्रस्ताव पाठवून दिनांक २८/०४/२०२१ पूर्वी मान्यता घेण्यात यावी.

**कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.**

सोबत- परिशिष्ट 'अ' 'ब' व शुल्क आकारावयाचा तक्ता

(स्वाक्षरी)
(डॉ. अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४.

---

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर –४१६ ००४.**

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/ 7174
कोल्हापूर ४१६००४.
दिनांक:- २५/०२/२०२१

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा व क.महाविद्यालय,
सातारा, सांगली व कोल्हापूर.

**माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) एप्रिल–मे २०२१ परीक्षा विद्यार्थ्यांची अतिविलंब/विशेष अतिविलंब /अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत** राज्य मंडळाचे .क्र.रा.मं./परीक्षा–८/१०३८ दि. २४/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सर्व शाळा प्रमुखांनी नोंद घेऊन आवेनदपत्रे भरण्याची दक्षता घ्यावी. परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही तसेच भरलेली आवेदनपत्रे कागदपत्रासह मंडळास सादर करेपर्यंत शुल्क आकारणी करण्यात येईल याचीही नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)
(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

परिशिष्ट-अ

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

परीक्षेचे नावः ------------------------
विभागीय मंडळाचे नावः--------विभागीय मंडळ----
प्रकरणिका क्रमांकः-----------------------

विद्यार्थ्यांची मुदतबाहय आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस
इ.१०वी

१) विद्यार्थ्याचे नाव : ----------------------------------
२) शाळेचे नाव व पत्ता : ---------------------------------
३) शाळेचा सांकेतांक क्रमांक : -------------------------------
४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) अशी खूण करावी.
अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार          ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन
क ( ) नैसर्गिक आपत्ती          ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास
इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास.

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.
१. -------------------------- २. ------------------------------
३. -------------------------- ४. ------------------------------
५. ------------------------------------------------------------
६) शाळा प्रमुखांची शिफारस :-
--------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------

मुख्याध्यापक स्वाक्षरी व शिक्का

७) अ. अतिविलंबाचे एकूण दिवस : -------------------- ब. अतिविलंबाच्या दंडाची रक्कम---------
क. दंड कशाप्रकारे भरला - रोख/धनाकर्ष (डी.डी.)/चलन क्रमांक ------------------------------
ड. विभागीय अध्यक्षांची शिफारस--------------------------------------------------
--------------------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ४६ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्यांचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी, विभागीय मंडळाचे नांव व शिक्का.

Ativilamb takta